Page No. 9

# लघुकथा

अलक - अति लघु कथा (शॉर्ट - फॉर्म)

ज्यात कथाबीज / कथेचा गाभा असतो. त्यातून काही मतितार्थ सूचित होतो. आणि पुढे त्याची कथा, लघुकथा, दीर्घ कथा बनू शकते.

## कोंडी

मी लेकीच्या बाळंतपणासाठी परदेशी चालले होते. तिथे सहा महीने रहाणार होते. इथून निघायला मोजून दहा दिवस होते आणि आईची तब्येत जरा बिघडली. म्हणावा असा मोठा आजार नव्हता. अशक्तपणा, जेवण जात नसतं. डॉक्टर म्हणाले, "नव्वदी आली, असं चालायचंच. रोजचा दिवस बोनस समजायचा आता." जिने जन्म दिला तिचा गळून पडण्याकडे सुरु झालेला प्रवास, तर तिकडे जिला जन्म दिला तिच्या गर्भात रुजलेला कोंब... जगात यायला आसुसलेला. मन द्विधावस्थेत आणि माझ्या मनाची कोंडी..!!

## कोंडी

भाचीच्या लग्नात कुणीतरी टोमणा मारला. दादाला आणि मला ते खरं वाटलं. भावा-बहिणीत अकारण गैरसमज झाला. दोघांचा इगो दुखावला. रक्षाबंधन आणि भाऊबीज, दोन्ही सण आले-गेले. पण दोन घरं दुरावलीच. माहेर तुटलं .... एकदा श्रावणात सहा वर्षांच्या माझ्या नातीला नातीला घेऊन देवळात गेले होते. तिथे दादा, वहिनी, भाची आणि भाचीचं छोटं बाळ सामोरी आले.

नात चटकन म्हणाली "आत्या, तुझं बाळ? म्हणजे माझा भाऊ ना? रक्षाबंधनाला याला घेऊन आमच्याकडे येशील? नक्की मी वाट पाहीन." क्षणात सगळे मान-अपमान गळून पडले. नकळत मनाची **कोंडी** कधी सुटली कळलंच नाही..!!

# विश्वास

पाच-सहा वर्षांची होते. दिवाळीमध्ये फटाके उडवत असताना फुलबाजीची ठिणगी डोळ्यात उडाली. एक डोळा अधू झाला तर दुसरा डोळा निकामी झाला तो कायमचाच. वाचून दाखवलेला अभ्यास करायला, जगात वावरायला शिकले. आलेली सत्य परिस्थिती स्विकारली. मिळालेला जन्म नाकारायचा मला आधिकार नाही हे मनाला उमजले. तसा विश्वास मनाला दिला.

संकटांवर मात करत पुढे गेले की संकटं 'छोटी' होतात. आपण मोठे होतो ही जाणीव निर्माण झाली आणि आपण कुणी आहोत हा विश्वास मनाला दिला,-- तो निर्माण झाला!!!



लीना माटे
मो. 9819534428



श्री. प्रकाश देशपांडे